श्री योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय,अंबाजोगाई

## मुलाखतीचे नियम,आवश्यक सूचना व पात्रता

- सर्व पदांसाठीच्या मुलाखती दि.१२ जुलै २०१९ रोजी घेण्यात येतील.
- मुलाखतीसाठी आपणास सर्व मूळकागदपत्रासह स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- मुलाखतीपूर्वी सकाळी ०९:०० ते १०:३० या वेळेत आपणास उपस्थितीची नोंद व कागदपत्र पडताळणी करुन घ्यावी लागेल.
- उपस्थितीच्या नोंदीच्या ठिकाणी अपणास ज्या पदासाठी काम करण्याची ईच्छा आहे, त्या पदाच्या नेमणूकी संदर्भात विनंती अर्ज, परिचय पत्र (Bio-Data) व विहीत शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
- सर्व पदांच्या नेमणूका केवळ एक शैक्षणिक वर्ष २०१९-२० कालावधी पुरत्या मर्यादित निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असून त्या बाबतीतील आपला कुठलाही कायम नेमणूकीचा दावा ग्राह्य धरल्या जाणार नाही.
- अनुदानित पदावरील नेमणूका मा.सह संचालक उच्च शिक्षण,औरंगाबाद व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मान्यतेच्या अधिन आणि नियमानुसार असतील.
- तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधन उच्च शिक्षण संचालक महाराष्ट्र शासन यांनी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी वेळोवेळी केलेल्या निर्देशाप्रमाणे अदायगी होईल.
- पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्राध्यापकांच्या पदासाठी शैक्षणिक अर्हता विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या निकष नियमावलीप्रमाणे पदव्युत्तर पदवी / आणि सेट- नेट/ पी.एचडी उत्तीर्ण अशी असेल.
- कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठीची शैक्षणिक अर्हता महाराष्ट्र शासनाच्या निकषाप्रमाणे पदव्युत्तर पदवी आणि बी.एड्.अशी असेल.
- सेवक पदासाठी किमान बारावी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. अधिकची शैक्षणिक पात्रता किंवा संगणकीय कामे करणाऱ्यांचा अग्रक्रमाने विचार करण्यात येईल.
- पदव्युत्तर पदवीसाठीच्या प्राध्यापकांच्या नेमणूका करार पध्दतीच्या व एक शैक्षणिक वर्ष २०१९-२० कालमर्यादेसाठीच्या असून एकत्रीत निश्चित मानधन स्वरुपात त्यांचे वेतन अदा होईल.
- सेवकांच्या पदासाठीच्या नेमणूकाही एक शैक्षणिक वर्ष २०१९-२० कालमर्यादेसाठी असून एकत्रित निश्चित मानधन स्वरुपात वेतन अदा होईल.

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य<br>स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय,<br>अंबाजोगाई | सचिव<br>श्री यो.शि.सं.,अंबाजोगाई | अध्यक्ष<br>श्री यो.शि.सं.,अंबाजोगाई |

Scanned by CamScanner